N.C.R.B (एन.सी.आर.बी

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) **P.S.(ठाणे):** बिडकीन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0021 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**07/01/2025 05:03

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):** पहर 8

**Date From (दिनांक पासून):** 06/01/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 06/01/2025

**Time From (वेळेपासून):** 23:26 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 23:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/01/2025 **Time (वेळ):** 04:49 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/01/2025 04:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 6 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** एमआयडीसी रोडवर गाढेगाव , फाटा जावळ जस्टपक इंन्ट्रस्टीर,यल कंपनीसमोर रांजनगाव शिवार,

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): किरण विठ्ठल निकम

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1997

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शेदूरवादा ता गंगापूर जि छ ,संभाजीनगर ,बिडकीन,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शेदूरवादा ता गंगापूर जि छ ,संभाजीनगर ,बिडकीन,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9921486218

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | धिरज धर्मराज जाधव | | | 1. एन 11डि 31/2 रवि नगर हडको छ ,संभाजीनगर , बिडकीन,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
फिर्याद
दिनांक 07/01/2025

मी खालील सही करणार किरण विठठल निकम वय 28 वर्षे, व्यवसाय-शेती व वाळू वाहतुक, रा.शेंदुरवादा, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर 9921486218
समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 06/01/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर जवळ सुरक्षीत ठिकाणी पोलीस निरीक्षक श्री.शांतीलाल चव्हाण यांचे व दोन पंचा समक्ष स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार दिली होती ती पुढील प्रमाणे,
मी किरण विठठल निकम वय 28 वर्षे, व्यवसाय-शेती व वाळू वाहतुक, रा.शेंदुरवादा, ता.गंगापुर जि छत्रपती संभाजीनगर
आज दिनांक 06/01/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर जवळ सुरक्षीत ठिकाणी श्री.शांतीलाल चव्हाण, पोलीस निरीक्षक, यांचे समक्ष तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहत असुन शेती व्यवसाय व वाळू वाहतूक/विक्री व्यवसाय करुन माझा व कुटुंबाचा उदरनिर्वाह होतो. वाळू वाहतुकी करिता माझ्याकडे माझ्या मालकीचे हायवा वाहन क्रमांक MH 24 J 7901 असुन सदर हायवाव्दारे मी शेंदुरवादा, गंगापुर, बिडकीन, पैठण व छत्रपती संभाजीनगर शहर परिसरात वाळू वाहतुक करुन विक्रीचा व्यवसाय करतो.
आज दिनांक 06/01/2025 रोजी सकाळी सहा, साडेसहा वाजेच्या सुमारास गाढेगाव फाटा, रांजनगाव शिवार येथे पोलीस धिरज जाधव हे भेटले. ते मला म्हणाले की, तु तुझे हायवा वाहनातुन वाळू वाहतुक करतो. तुला जर बिडकीन व ग्रामीण हददीतुन तुझ्या हायवा वाहनाने वाळु वाहतुक करायची असेल तर तुला हप्ता म्हणुन विस हजार रुपये दयावे लागतील, त्यावर मी त्यांना कश्याकरिता दयावे लागेल असे म्हणालो असता ते म्हणाले की हप्ता दिला नाहीतर तुझ्या हायवा वाहनावर कारवाई होईल असे बोलुन माझ्याकडे विस हजार रुपये लाचेची मागणी केली. मी त्यांना नाईलाजाने हो म्हणालो आहे. माझे श्री.धिरज जाधव पोलीस हवालदार यांच्याशी कसलेही वैर अगर दुष्मनी नाही. तसेच माझा व त्यांचा वैयक्तीक देण्या-घेण्याचा अगर उसणवारीचा व्यवहार नाही.
तरी दिनांक 06/01/2025 रोजी मला पोलीस श्री.धिरज जाधव हे रात्री आठ वाजेच्या सुमारास गाढेगाव फाटा येथे भेटण्यासाठी येणार आहे. त्यावेळी श्री.धिरज जाधव यांनी माझे हायवा वाहन क्रमांक MH 24 J 7901 ने बिडकीन व ग्रामीण हददीतुन वाळू वाहतुक करावयाची असल्यास 20000/- रुपये हप्ता म्हणुन लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वत: किंवा ईतरा मार्फत स्विकारल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे. माझी वरिल तक्रार माझे मी स्वहस्ताक्षरात लिहीली असुन ती बरोबर व खरी आहे.
मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री.शांतीलाल चव्हाण यांनी बोलविलेले शासकिय पंच क्र. 1 श्री. पवन राजु जाधव वय 24 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-लिपीक टंकलेखक, अस्थापना-1, महानगर पालीका छत्रपती संभाजीनगर, रा. एन-9, एल, सिडको, छत्रपती संभाजीनगर व पंच क्र. 2. श्री.प्रतिक प्रमोद लाडे वय 29 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-लिपीक टंकलेखक, वार्ड नं.9 महानगर पालीका छत्रपती संभाजीनगर रा. रमानगर, घर नं. डी 35, गल्ली नं. 2, क्रांतीचौक, छत्रपती संभाजीनगर असा आमचा ओळख परिचय करुन दिला. त्यानंतर मी थोडक्यात तोंडी तक्रार पंच व पो.नि.श्री. शांतीलाल चव्हाण यांना सांगुन माझी लेखी तक्रार दिली त्यावर मी दोन्ही पंचानी व पो.नि.श्री. शांतीलाल चव्हाण साहेब यांनी स्वाक्षरी केल्या आहेत.
माझ्या तक्रारीचे अनुषंगाने पो.नि.श्री. शांतीलाल चव्हाण व शासकिय पंच असे सर्वानुमते पोलीस श्री.धिरज जाधव यांची दिनांक 06/01/2025 रोजी गाढेगाव फाटा, राजंनगाव शिवार येथे जावुन लाच मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर पो.नि.श्री.शांतीलाल चव्हाण, सापळा पथक व शासकिय पंच असे सापळा कारवाईकामी लागणारे साहित्यासह खाजगी वाहनाने ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथुन 18.30 वा.रवाना होवुन गाढेगाव फाटा, रांजनगाव शिवार जवळ सुरक्षीत ठिकाणी थांबलो. तेथे पो.नि.श्री.शांतीलाल चव्हाण यांनी मला व पंचाना लाचमागणी पडताळणी मध्ये सोनी कंपनीची डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती दिली तसेच त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पंचासमक्ष डीजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये यापुर्वीचे काही संभाषण रेकॉर्ड नसल्याचे दाखवुन दिले. त्यानंतर माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुन पंच क्र. 1 श्री.पवन राजु जाधव यांचेसह माझी स्विफ्ट कार क्र. एमएच 20 डी.व्ही.4354 मध्ये पोलीस श्री.धिरज जाधव यांना भेटण्यासाठी 22.13 वा. रवाना केले. आम्ही वाळुज एमआयडीसी रोडवर गाढेगाव फाटा, रांजनगाव शिवार येथे गेलो तेथे पोलीस श्री.धिरज जाधव यांना भेटलो त्यावेळी मी पोलीस श्री.धिरज जाधव यांना मी माझे हायावा वाहन क्रमांक MH 24 J 7901 हा कन्टीन्युव बिडकीन, पैठण हददीतुन वाळू वाहतुकीसाठी चालतो असे सांगितले त्यावर पोलीस श्री.धिरज जाधव हे मला म्हणाले की, ट्राफीकचे फक्त देवुन टाका मी त्यांना किती आणायचे असे विचारले असता त्यांनी विस असे म्हणाले मी त्यांना विस हजार का असे बोललो असता ते हो म्हणाले तसेच सदर पैसे हे महिणाभर गाडी चालवायाचे असल्याचे सांगुन माझ्याकडे 20000/-रुपये लाचेची मागणी केली आमचे असे बोलणे झाल्यानंतर मी पंचासह सुरक्षीत ठिकाणी परत आलो. सापळा अधिकारी पो.नि.श्री.शांतीलाल चव्हाण यांनी विचारले वरुन पंच क्र.1 यांनी व मी सर्व हकिगत सांगितली त्यानंतर पो.नि. चव्हाण यांनी पंचासमक्ष डीजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले त्यावरुन पोलीस श्री.धिरज जाधव यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाल्याने पो.नि.शांतीलाल चव्हाण, पंच सर्वानुमते लगेचच दिनांक 06/01/2025 रोजी वाळुज एमआयडीसी रोडवर गाढेगाव फाटा, रांजनगाव शिवार, ता.पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथे लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला. सापळा कारवाईच्या वेळी पोलीस श्री.धिरज जाधव यांना लाच म्हणुन देण्याकरिता मी हजर केलेली 20000/- रुपये रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या भारतीय चलनी 40 नोटा त्यांना ऍन्थ्रोसिन पावडर लावुन माझ्या जिन्स पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिश्यात ठेवण्यात आल्या. माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला व पंच क्रमांक क्र.1 श्री.पवन राजु जाधव असे आम्हाला सुरक्षीत ठिकाणावरुन 23.03 वा. रवाना केले. त्यानंतर मी पंच क्र.1 श्री.पवन राजु जाधव असे माझे स्विफ्ट कार मध्ये वाळुज एमआयडीसी रोडवर गाढेगाव फाटया, रांजनगाव शिवार, ता.पैठण जि.छत्रपती संभाजीनगर येथे गेलो त्यावेळी श्री.धिरज जाधव हे गाढेगाव फाट्यापासुन थोडे पुढे जस्टपॅक इंन्ट्रस्टीरिअल कंपनी समोर असल्याने त्या ठिकाणी जावुन यांना भेटलो त्यावेळी श्री.धिरज जाधव यांनी मला किरण ये किरण असे हाक मारली मी त्यांना बोलना असे म्हणालो असता ते पैसे देवुन टाक असे म्हणाले त्यावर मी माझ्या जिन्स पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिश्यातुन लाचेची रक्कम उजव्या हाताने काढून श्री.धिरज जाधव यांचे समोर धरली असता त्यांनी पंच क्र. 1 यांचे समक्ष सदरची लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्वत: स्विकारुन त्यांचे नेसणीस असलेल्या जिन्स पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यामध्ये ठेवली. त्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अश्या रितीने 23.26 वाजता पुर्वनियोजीत ईशारा केला असता सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी व पंच असे घटनास्थळी हजर आले व पोलीस निरीक्षक श्री.शांतीलाल चव्हाण यांनी लोकसेवक पोलीस धिरज जाधव यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेतले. त्यांना आपला व सापळा पथकाचा परिचय देवुन त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव धिरज धर्मराज जाधव वय 50 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-पोलीस हवालदार बं.नं. 353 नेमणुक वाहतुक शाखा, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) रा. एन-11, डी,31/2, रविनगर हाडको, छत्रपती संभाजीनगर असे सांगितले. त्यानंतर पो. नि.श्री.शांतीलाल चव्हाण, दोन्ही पंच, सापळा पथक व पोलीस श्री.धिरज जाधव व मी असे तेथुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे आलो. सदर घटनेबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी दिनांक 06/01/2025 रोजी लोकसेवक धिरज धर्मराज जाधव वय 50 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-पोलीस हवालदार बं.नं. 353 नेमणुक वाहतुक शाखा, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) यांनी माझ्याकडे माझे मालकीचे हायवा वाहन MH 24 J 7901 ने बिडकीन व ग्रामीण हददीतुन वाळु वाहतुक करायची असल्यास हप्ता म्हणुन 20000/- रुपयाची लाचेची मागणी करुन सदरील लाच रक्कम दिनांक 06/01/2025 रोजी 23.26 वाजता वाळुज एमआयडीसी रोडवर गाढेगाव फाटा जवळ, जस्टपॅक इंन्ट्रस्टीरिअल कंपनी समोर, रांजनगाव शिवार, ता.पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथे माझ्याकडून पोलीस श्री.धिरज धर्मराज जाधव, पोह.353 यांनी पंचसाक्षीदारा समक्ष स्वत: स्विकारली आहे. करिता लोकसेवक धिरज धर्मराज जाधव वय 50 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पद-पोलीस हवालदार बं. नं. 353 नेमणुक वाहतुक शाखा, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विनंती



Scanned with OKEN Scanner

आहे.
माझी वरिल फिर्याद माझे सांगणे प्रमाणे माझे समक्ष मराठीत संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन ती मी वाचुन पाहिली ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.
समक्ष हि फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

NILESH SHIVAJI SHELKE(SI (Sub-Inspector)) / 15101000402NSSM8801F **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)



पोलीस ठाणे अमलदार
पोलीस स्टेशन बिडकीन
ता.पैठण, जि.औरंगाबाद (ग्रामीण)

Scanned with OKEN Scanner